N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

PDF Compressor Free Version

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** चिमुर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0237 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/06/2024 01:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 17/06/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/06/2024

**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/06/2024 **Time (वेळ):** 16:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/06/2024 01:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** समर्थ कॉफी हाउस पंचायत समीती , कार्यालय समोर चिमुर ,चिमुर , 442903

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

PDF Compressor Free Version

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रमोद अशोक धाडसे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा कळमगाव ,चिमुर ,चिमुर,चंद्रपुर,महाराष्ट्र,442903,भारत |
| 2 | स्थायी पता | रा कळमगाव ,चिमुर ,चिमुर,चंद्रपुर,महाराष्ट्र,442903,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलींद मधुकर वाढई | | | 1. रा गोंदेळा ,चिमुर ,चिमुर,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत-442903 |
| 2 | आशिष खुशाब पेंदाम | | | 1. रा देवळी ,चिमुर,चिमुर,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत-442903 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | वन प्लस कंपनीचा मॉडेल क्र. CPH2467 | 0.00 |

PDF Compressor Free Version

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | व्हीओ कंपनीचा निळ्या रंगाचा मोबाईल | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपयाच्या 20 नोटा | 10,000.00 |
| 4 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | मेमरी कार्ड 32 जीबी वाला सॅन्डीक्स अल्ट्रा कंपनीचा | 0.00 |
| 5 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | मेमरी कार्ड 32 जीबी वाला सॅन्डीक्स अल्ट्रा कंपनीचा | 0.00 |
| 6 | इतर | घरगुती वस्तु | फिकट ग्रे रंगाचा जिन्स पॅन्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद                दिनांक:- 19/06/2024

मी प्रमोद अशोक धाडसे, वय 32 वर्षे, धंदा-रोजमजुरी, रा. कळमगाव,पो. जामगाव कोमटी ता.चिमुर जि. चंद्रपुर येथे राहतो. मला सन 2022-2023 मध्ये या आर्थिक वर्षाकरिता शबरी आवास योजनाअंतर्गत घरकुल मंजुर करण्यात आलेले असुन आजपावेतो मला सदर शबरी घरकुल योजनेतुन दिनांक 02/08/2023 रोजी 20,000/-रू व दिनांक 12/02/2024 रोजी 45,000/-रू. असे एकुण 65,000/-रू. माझे बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा- भिसी ता. चिमुर जि. चंद्रपुर येथील खाता क्र 60062209389 मध्ये जमा करण्यात आले आहे. परंतु उर्वरित तिसऱ्या टप्प्यांची 45,000/-रू व चौथ्या टप्प्यांची 20,000/-रू ची अशी एकुण 65,000/-रू. ची रक्कम अजुन पावेतो मला मिळालेली नाही. त्याकरिता मी दिनांक 07/06/2024 रोजी अंदाजे दुपारी 2/30 वा. दरम्यान गै.अ.श्री. मिलींद वाढई, इंजिनिअर साहेब, यांना पंचायत समिती चिमुर येथे जावुन भेटलो असता त्यांनी मला ''तुझे शबरी आवास योजनेचे एकुण 65,000/-रू. मिळालेले असुन उर्वरित 65,000/-रू. ची रक्कम तुझे खात्यात जमा करायचे असल्यास त्याकरिता मला 20,000/-रू. द्यावे लागतील अन्यथा तुझे खात्यात रक्कम जमा करणार नाही'' असे म्हणाले त्यावर मी, त्यांना सध्या माझेकडे एवढे रूपये नाहीत. माझेकडे रूपये जमल्यावर मी तुम्हाला येवुन भेटतो असे म्हणुन तिथुन निघुन गेलो. मला गै.अ.श्री. मिलींद वाढई , इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी, दिनांक 17/06/2024 रोजी दुपारी अंदाजे 1/00 वा. दरम्यान लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन पोलीस निरीक्षक श्री गुरनुले साहेब यांना भेटुन सर्व हकीकत सांगितली असता, श्री गुरनुले साहेब यांनी मला लेखी तक्रार देणेस सांगितले. त्यावरून मी त्यांना माझे स्व:हस्ताक्षरात गै.अ.श्री. मिलींद वाढई , इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर यांचे विरूध्द लेखी तक्रार दिली. मी रोजमजुरीचे काम करून आपले कुटुंबाचा उदरनिर्वाह करित असल्यामुळे गै.अ.श्री वाढई, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती चिमुर यांना देणेकरिता सदरची लाच रक्कम उपलब्ध झाली नव्हती. माझेकडे 10,000/-रू ची रक्कम उपलब्ध झाल्याने दिनांक 17/06/2024 रोजी गै.अ.श्री. मिलींद वाढई इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर यांचेविरूध्द तक्रार दिली. तरी गै.अ.श्री. मिलींद वाढई इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. मला लाच मागणाऱ्या गै.अ.श्री वाढई, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर यांचे विरुध्द कार्यवाही होण्याकरीता लाच रक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम माझे वैयक्तिक बचतीतुन जमा केलेले 10,000/-रू.आपणाकडेलाच रक्कम म्हणुन वापरण्या करीता देत आहे. तरी

PDF Compressor Free Version

शबरी आवास योजना अंतर्गत असलेल्या घरकुल योजनेचे तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांची रक्कम माझे खात्यावर जमा करण्याचे कामाकरिता 20,000/-रू ची लाच मागणारे गै.अ.श्री. मिलींद वाढई, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर यांचेविरुध्द कार्यवाही होणेस श्री. गुरनुले साहेब यांना मी लेखी तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी त्यांचे कार्यालयात पुर्वीपासुनच मा. उपकार्यकारी अभियंता सं. व सु. उपविभाग क्र 03, महावितरण चंद्रपुर येथिल हजर असलेल्या दोन्ही पंचाची व स्टॉफची माझे सोबत ओळख करुन दिली. श्री. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा लेखी तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या लेखी तक्रार अर्जावर दोन्ही पंचानी व श्री. गुरनुले साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांना मी, सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) दिलेल्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करुन दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी दिलेल्या सूचनेवरुन ना.पो.कॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषणSONY कंपनीचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनी गुरनुले साहेब यांनी मला गैरअर्जदार मिलींद वाढई केव्हा कार्यालयात हजर भेटतील याबाबत विचारले असता मी त्यांना सांगीतले कि, गै.अ.श्री. मिलींद वाढई, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर हे आज दिनांक 17/06/2024 रोजी बकरी ईद निमीत्य शासकिय सुटटी असल्याने कार्यालयात मिळुन येणार नाही. तसेच उदया दिनांक 18/06/2024 ला मंगळवार असल्याने ते बाहेर फिल्डवर जातात त्यामुळे ते पंचायत समीती चिमुर कार्यालयात हजर मिळुन येणार नाहीत. तेव्हा आपण बुधवार दिनांक 19/06/2024 रोजी पुढील कार्यवाही करावी असे सांगितले. त्यावरून पोनी गुरनुले साहेब यांनी मला दोन्ही पंच व कार्यालयीन स्टॉफ समक्ष गोपनीयता बाळगण्याबाबत सुचना देवुन पुढील कार्यवाही हि दिनांक 19/06/2024 रोजी करण्याची तजवीज ठेवण्यात आली. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या).

आज दिनांक 19/06/2024 रोजी मी सकाळी अंदाजे 07/00 वाजता दरम्यान पोनी श्री. गुरनुले साहेब यांना फोन करुन सांगीतले कि, गै.अ.श्री. मिलींद वाढई, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर हे आज पंचायत समीती कार्यालय चिमुर येथे हजर येणार आहे. त्यावरून श्री. गुरनुले साहेब यांनी मला सांगीतले कि, आम्ही पंच व कार्यालयीन स्टॉफसह सकाळी 11/30 वा. पर्यत चिमुर येथे येत असुन चिमुर येथिल शासकिय आय.टी.आय. चे पाठीमागे असलेल्या एम.आय.डी.सी. परिसरात सुरक्षित ठिकाणी थांबुन राहण्याची समज दिली.
त्यानुसार मी दिनांक 19/06/2024 रोजी सकाळी 11/30 वाजता दरम्यान चिमुर येथिल शासकिय आय.टी. आय. चेएम.आय.डी.सी. परिसरात सुरक्षित ठिकाणी हजर असतांना श्री. गुरनुले साहेब हे त्यांचे कार्यालयीन स्टॉफ व पंचासह मी हजर असलेल्या ठिकाणी आले. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष गै.अ.श्री. मिलींद वाढई, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चिमुर यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन परत एकदा थोडक्यात माहिती दिली. श्री. गुरनुले साहेब यांनी मला गै.अ. मिलींद वाढई , इंजिनिअर हे कुठे भेटणार याबाबत विचारणा केली असता ते पंचायत समीती कार्यालय चिमुर येथे हजर आहेत याबाबत सांगितले.
त्यावरून श्री गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर श्री गुरनुले साहेब, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.
त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन ना.पो.कॉ. संदेश वाघमारे यांनी SONY कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मी सोबत आणलेल्या हिरो होंडा स्पेल्डर दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-एन. 4771 नी पंच क्र. 01 यांचेसह मला पंचायत समीती कार्यालय चिमुर येथे गै.अ.श्री मिलींद वाढई , इंजिनिअर,

PDF Compressor Free Version
पंचायत समिती, चिमुर यांचेकडे पडताळणी करीता 12/11 वा. पाठविले.

पडताळणी दरम्यान मी, गै.अ. श्री मिलींद वाढई, इंजिनिअर यांना भेटुन ''आपले चेक नाही टाकले न'' असे म्हणालो असता त्यावर गै.अ. मिलींद वाढई यांनी मला ''हो त ते तुम्ही केल नाही न..'' असे म्हणालेत्यावर मी त्यांना ''तिसरा ही राहीला चौथाही राहीला'' असे म्हणालो तेव्हा त्यांचे सोबत असलेला मित्र गै.अ. आशिष पेंदाम यांनी मला ''चौथाही का ...साहेबाला काही करून टाका ना तुम्ही चहा पाणी, बोला लागते का '' असे म्हणालो असता त्यावरगै.अ. श्री. मिलींद वाढर्इ यांनी मला ''दहा आधी करा, दहा जमा झाल्यावर करून दया, वीस मध्ये मानल होत, '' असे म्हणुनगै.अ.श्री मिलींद वाढई, इंजिनिअर, पंचायत समिती, चिमुर यांनी 20,000/- रूपये ची लाचेची मागणी करून तडजोडीअंती 10,000 रूपये/- लाचरक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली.तसेच गै.अ. श्री मिलींद वाढई इंजिनिअर यांचे मित्र श्री.आशिष पेंदोर यांनी सुध्दा मला गै.अ. मिलींद वाढई इंजिनिअर, यांचेकरीता लाच रक्कम देण्याकरीता अपप्रेरणा दिली. पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर वेळ 12/41 वा. व्हॉईस रेकॉर्ड बंद करण्यात आले. त्यानंतर श्री गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीनतंर अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर श्री गुरनुले साहेब, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.
त्यानंतर पोनि. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मध्ये झालेल्या संभाषणाची टेप ऐकुन गै.अ. श्री मिलींद वाढर्इ, इंजिनिअर व गै.अ. आशिष पेंदोर यांनी मला शबरी आवास योजने अंतर्गत घरकुलाचे तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांची रक्कम माझे खात्यावर जमा करण्याचे कामाकरिता 20,000/-रू ची लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती माझेकडून पंचासमक्ष लाचेची रक्कम 10,000/- रू स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून गै.अ. श्री मिलींद वाढर्इ, इंजिनिअर व गै.अ. आशिष पेंदोर यांचेविरूध्द पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर श्री गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळा पुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर श्री गुरनुले साहेब, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.
त्यानंतर पंचनामा क्र. 1 प्रमाणे मला अँथ्रॅसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझे शर्टाचे समोरील डाव्या बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गै.अ. श्री मिलींद वाढई इंजिनिअर व गै.अ. आशिष पेंदोर यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळयातील पांढऱ्यां रंगाचा दुपट्टा गळयातुन काढुन चेहरा पुसुन डाव्या हातात ठेवुन लाचरक्कम स्विकारल्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.तसेच श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन नापोकॉ. संदेश वाघमारे यांनी SONY कंपनीचेव्हॉईस रेकॉर्डर सुरु करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मी सोबत आणलेल्य हिरो होंडा स्पेल्डर दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-एन. 4771 नी पंच क्र. 01 यांचेसह पंचायत समीती कार्यालय चिमुर येथे जाण्यास 14/10 वाजता रवाना केले व सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. मी व पंच क्र. 01 पंचायत समीती कार्यालय चिमुर येथे गै.अ. मिलींद वाढई यांचे कक्षात गेलो असता ते तेथे हजर मिळुन आले नाही ते कार्यालयातील मिटींग हॉल मध्ये असल्याचे समजले. (सीसीटीएनएस प्रणालीमध्ये शब्दाची संख्या ही 8000 मर्यादीत असल्याने मुळ लेखी रिपोर्ट ही FIR ला सलग्न करण्यात येत आहे.)

PDF Compressor Free Version

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH BHIMRAO BAKAL(I (Inspector)) / POBN73120 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

प्रमोद अ. घाडगे

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature] 24/6/9

पो. नि. [stamp]

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH BHIMRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN73120

PDF Compressor Free Version

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)